# माझे वडील

**असे म्हणतात, की प्रत्येक मुलाचा पहिला आदर्श त्याचा पिता असतो. माझ्या बाबतीत तसेच होते. लहान वयापासून त्यांची- माझ्या पित्याची- प्रा. विष्णू वासुदेव नारळीकर यांची जीवनचर्या मी पाहत आलो: पुस्तकांचा विलक्षण नाद, खेळांत रुची, फरशीवर पुस्तके- वह्या व कागद पसरून अभ्यास करणे, विद्यार्थ्यांशी चर्चा, आदी सर्व मी मनःपटलावर 'साठवून' ठेवत होतो.**

**जयंत नारळीकर**

२००६ : नोव्हेंबर ६; तारीख ६-११-६ उलटी केली तरी तीच राहते म्हणून माझ्या लक्षात राहते. त्या दिवशी सकाळी कोल्हापूरहून मी आणि सौ. मंगला पाटगावच्या दिशेने बाहेर पडलो. सोबत श्री. खंडकर आणि श्री. शिंदे व श्री. नाशिककर मार्गदर्शक म्हणून होते.

मॉन्सूनच्या तडाख्यानंतर पुण्याच्या रस्त्यांची जी स्थिती होते तीच कोल्हापूरच्या रस्त्यांची पण होती. 'खड्डे पंचविशी' संपल्यावर महामार्ग सुरू झाला तेव्हा मनातली ही कल्पना दृढ झाली, की महामार्गाचे रसायन आणि कॉर्पोरेशनने बांधलेल्या वा दर वर्षी 'दुरुस्त' केलेल्या शहरी मार्गाचे रसायन यांत पुष्कळ फरक असणार. अन्यथा एक मार्ग खड्ड्यांनी भरून जातो आणि दुसरा यथास्थित असतो हे कसे?

दोन तासांच्या प्रवासानंतर आम्ही महामार्गावर डावीकडे वळण घेऊन एक बारका रस्ता घेऊन पाटगाव खेड्याकडे आलो. सरळ मार्गाने पुढे पाटगावचे धरण लागले असते; पण आम्हाला धरणापेक्षा खेडेच पाहायचे होते.

ग्रामस्थ ज्येष्ठांनी आमचे स्वागत केले.. तेथील जुने भद्रकालीचे देऊळ दाखवले. समोरच नवे देऊळही होते. नंतर जुन्या आठवणी असणाऱ्यांनी आम्हाला शेतातून मार्ग काढत नदीशेजारी नेले. "ती पाहा, त्या तिकडे एकेकाळी काही ब्राह्मण कुटुंबे राहत होती : जोशी, दीक्षित, ठकार, अग्निहोत्री, अभ्यंकर, जमदग्नी, शास्त्री आणि नारळीकर," शेताच्या एका दिशेला बोट दाखवीत ते म्हणाले. आता तिथे वास्तूचा मागमूस नव्हता. आम्ही उभे होतो तेथे एका मंदिराचे भग्नावशेष होते. हे मंदिर नारळीकरांच्या घराला लागूनच असे. नदीचे पाच घाट नारळीकर, दीक्षित, जोशी, जमदग्नी व शास्त्री यांचे नावे असत.

'नारळीकर' हे नाव कशावरून आले असावे? 'नारळी' नामक गावातून आल्यामुळे? का नारळाच्या झाडांच्या लागवडीचे मालक असल्यामुळे? प्रश्नांची उत्तरे माझ्याकडे नाहीत; पण पाटगावमध्ये ऐकलेल्या गोष्टीनुसार नारळीकरांकडे आंब्याची झाडे होती. तेथील काही झाडांना नारळाएवढे मोठे आंबे लागत असत म्हणून त्यांचं नाव पडलं नारळीकर!

माझ्या वडिलांचे वडील वासुदेवशास्त्री नारळीकर हे संस्कृत पंडित व प्रवचनकार होते. त्यांची प्रवचने विद्वत्तापूर्ण व रसाळ होती, असे ती प्रत्यक्ष ऐकलेल्या काही वडील मंडळींकडून मी ऐकले होते. खुद्द माझ्या वडिलांकडून त्यांच्याबद्दल काही कळू शकले नाही. कारण आजोबा गेले तेव्हा वडील केवळ दहा वर्षांचे होते.

महाद्वार रोडवरील नारळीकरांचा वाडा एकेकाळी मोठा होता; पण रस्तारुंदीकरणात पाडण्यात आला, असे बुजुर्ग लोक सांगतात. माझे वडील तीन भावांपैकी सर्वांत लहान आणि तल्लख बुद्धीचे. त्यांचा जन्म २६ सप्टेंबर, १९०८ चा. शाळेत त्यांच्या बुद्धिमत्तेची छाप लहानपणापासूनच पडत गेली. आधी विद्यापीठ व मग राजाराम हायस्कूल दोन्ही ठिकाणी त्यांना कौतुक करणारे शिक्षक भेटले. म्हणून त्यांचे वडील लवकर गेले तरी त्यांचे शिक्षण अबाधित राहिले. मॅट्रिकच्या परीक्षेत चौथा नंबर पटकावून व शिष्यवृत्त्या मिळवून ते कॉलेजातील शिक्षणासाठी मुंबईस आधी एल्फिन्स्टन कॉलेज व नंतर रॉयल इन्स्टिट्यूट ऑफ सायन्समध्ये गेले. बी.एस्सी. परीक्षेत 'रेकॉर्ड मार्क' मिळवून ते प्रथम आले. त्यांचे नाव रॉयल इन्स्टिट्यूट ऑफ सायन्सच्या 'रोल ऑफ ऑनर'वरती कोरलेले आढळते. त्यानंतर १९२८-३२ ते केंब्रिजमध्ये उच्च शिक्षणासाठी गेले. गणिताच्या ट्रायपॉसमध्ये स्टार रँग्लरची उपाधी मिळवून संशोधनात 'रॅले प्राइझ' व 'आयझॅक न्यूटन स्टुडंटशिप' मिळवून ते परतले ते 'बनारस हिंदू युनिव्हर्सिटी'त प्राध्यापक आणि गणित विभागाचे प्रमुख म्हणून... अवघ्या २४ वर्षांच्या वयात. केंब्रिजमधील शिक्षण शक्य झाले, याचे कारण माझ्या वडिलांना जे.एन. टाटा एंडाउमेंटतर्फे शिष्यवृत्ती मिळाली. त्याचप्रमाणे कोल्हापूर दरबारतर्फे कर्जही उपलब्ध झाले. ते कर्ज फेडण्यासाठी त्यांना कोल्हापूर संस्थानात नोकरी करणे आवश्यक होते.

माझे वडील केंब्रिजमध्ये शिकत असताना 'बनारस हिंदू युनिव्हर्सिटी'चे संस्थापक पंडित मदनमोहन मालवीयजी 'राउंड टेबल कॉन्फरन्स'साठी १९३१ मध्ये इंग्लंडला गेले होते. एक प्रतिभावान होतकरू गणिती म्हणून माझ्या वडिलांची कीर्ती त्यांच्यापर्यंत पोचली होती. आपल्या विद्यापीठाकडे हुशार विद्वानांना शिक्षक म्हणून आकर्षित करावे, असे धोरण मालवीयजी कित्येक वर्षे राबवीत आले होते. लंडनला गेल्यावर ते मुद्दाम वेळ काढून माझ्या वडिलांना भेटले आणि त्यांना विद्यापीठात गणिताचे प्राध्यापक म्हणून येण्याचे आमंत्रण दिले. "तुमचे येथील शिक्षण संशोधन पूर्ण झाले, की मला बनारसमध्ये भेटा - आपण तुमची निवड पक्की करू!" हे आश्वासन मालवीयांनी पाळले. इतकेच नव्हे तर १९३२ मध्ये सुटीकरता माझे वडील केंब्रिजहून भारतात आले, तेव्हा त्यांना आग्रह करून मालवीयांनी आपल्या विद्यापीठात त्यांची नेमणूक केली. त्यामुळे पुढे केंब्रिजला परतण्याचा आणि एखादे वर्ष अमेरिकेतल्या माउंट विल्सन वेधशाळेत घालवण्याचा आपला इरादा त्यांनी बदलला. येथे हे पण नमूद करायला पाहिजे, की माझ्या वडिलांना विद्यापीठात नोकरी करता यावी म्हणून मालवीयजींनी कोल्हापूर सरकारचे कर्ज विद्यापीठातर्फे फेडले.



वडील प्रा. विष्णू नारळीकर आणि मातु:श्री यांच्यासोबत जयंत नारळीकर

अलीकडील विद्यापीठांतील निवासांच्या तुलनेत आमचे स्टाफ क्वार्टर पुष्कळ मोठे होते. त्या वेळच्या आकारविल्हे अनुक्रमात A, B, C, ... ते C दर्जाचे म्हणजे वरून तिसरे. गराज, स्वयंपाकघर, बाथरूम आदी वगळता त्यांत अकरा खोल्या व प्रचंड व्हरांडे, गच्च्या वगैरे होत्या. शिवाय तीन नोकरांसाठीच्या खोल्या. गराज जरी कार ठेवण्यासाठी बांधले होते तरी आमच्याकडे कार नसल्याने त्याचा उपयोग लाकडे ठेवायला होत असे. (सबंध युनिव्हर्सिटीत त्या काळी फार तर ५-६ लोकांच्या मोटारगाड्या असतील.)

लाकडे कशासाठी? आंघोळीचे पाणी गरम करायला, तसेच स्वयंपाकासाठी. पाणी गरम करायचे खास बंब असत आणि पहाटे उठल्यावर ते 'चालू' केल्यावर दीड-दोन तासांत आंघोळीसाठी मुबलक पाणी मिळे. ही लाकडे विकायला घरी विक्रेता येई... पुष्कळशे उंट घेऊन. लाकडे वाहून पुष्कळ लांबून आलेले उंट, आवारात शिरल्यावर फतकल मारून बसत. विक्रेता जवळचा तराजू कोठेतरी अडकवून एका पारड्यात वजन टाके. त्याचा भाव ठरल्यावर लाकडे दुसऱ्या पारड्यात भरून मग गराजमध्ये जात. वजन मणात मोजले जाई (१ मण = ४० किलो). वजन करून लाकडे गराजमध्ये भरण्यात संपूर्ण सकाळ जाई. शाळेपूर्वीच्या वयात आम्हाला (मला आणि माझ्या धाकट्या भावाला) ही एक करमणूक असे.

सकाळी वडील योगासने, सूर्यनमस्कार आदी करताना दिसत. तेव्हा त्यांची सुडौल शरीरयष्टी पाहून आपण अगदीच काडीपैलवान आहोत असे मला वाटे. त्यांचा व्यायाम झाल्यावर आमचा चहा-दूध आदीचा कार्यक्रम असे. कधी कधी उशिरा जाग आली, की माझ्या भावाचा एकशब्दी प्रश्न असे : 'झाला?' म्हणजे चहा तयार झाला का?

त्या काळी माझ्या वडिलांचा व्यायाम आणि बॅडमिंटनवर भर असे. घरी मोठे आवार होते. त्यात बागेकरता व आमच्या हुंदडण्यासाठी मुबलक जागा ठेवूनही बॅडमिंटन कोर्टसाठी त्यांनी जागा केली व तेथे सिमेंट काँक्रिटचे कोर्ट बांधले. त्यावर खेळण्यासाठी त्यांनी युनिव्हर्सिटीतल्या उत्तम खेळाडूंना 'मुक्त कोर्ट' ठेवले होते. आम्हालाही खेळायला त्यांनी उत्तेजन दिले. त्या कोर्टवर उत्तम खेळ पाहायला मिळाल्याने- एकेकाळी नॅशनल चॅम्पियन असलेल्या टी. एन. सेठचा खेळ आम्ही तेथे पाहिला- त्यामुळे आम्हा दोघा भावांच्या खेळावरही उत्तम संस्कार घडले.

माझे वडील ग्रंथवेडे होते. आमचे घर मोठे असूनही पुस्तकांनी भरून ओथंबले होते. ही पुस्तके वडिलांनी विकत घेतलेली किंवा काही विद्यापीठांतल्या ग्रंथालयातून वाचायला आणलेली. कधी कधी पुस्तक विक्रेते ग्रंथांचे गठ्ठे घेऊन घरी येत, तेव्हा वडिलांना पुंडलिकाभेटी परब्रह्म आल्यासारखे वाटत असणार. पंच या ब्रिटिश नियतकालिकातील विनोदी कार्टून्सचे विषयानुसार केलेले संग्रह - अख्खे वीस हार्डबाउंड ग्रंथ त्यांनी अशाच विक्रेत्याकडून घेतले. ते आजही आमची करमणूक करतात.

असे म्हणतात, की प्रत्येक मुलाचा पहिला आदर्श त्याचा पिता असतो. माझ्या बाबतीत तसेच होते. लहान वयापासून त्यांची जीवनचर्या मी पाहात आलो. पुस्तकांचा विलक्षण नाद, खेळांत रुची, फरशीवर पुस्तके, वह्या व कागद पसरून अभ्यास करणे, विद्यार्थ्यांशी चर्चा, आदी सर्व मी मनःपटलावर 'साठवून' ठेवत होतो, की पुढे आपणही असेच जीवन जगायचे.

वडिलांना, तात्यासाहेबांना त्यांचे निकटवर्तीय खूप मान द्यायचे. वयाने, अनुभवाने त्यांच्याहून वडील असे लोकही त्यांचे मत, सल्ला महत्त्वाचा मानीत. कुलगुरू मालवीयजी, डॉ. राधाकृष्णन, सर सी. पी. रामस्वामी अय्यर त्यांच्याशी बऱ्याच मुद्द्यांवर चर्चा करत. केंब्रिजमधून यशस्वी 'करियर' करून कोल्हापूरला परतल्यापासून त्यांच्याबद्दल ही आदराची भावना निकटवर्तीयांत निर्माण झाली, वाढत गेली.

केंब्रिजहून परतल्यावर त्यांनी शिक्षण संशोधन चालू ठेवले. त्यांच्यामुळे भारतात सापेक्षता सिद्धान्तावर मोठ्या प्रमाणात काम सुरू झाले. कलकत्ता (एन. आर. सेन) आणि बनारस (माझे वडील) ही त्या दृष्टीने भारतात सापेक्षतावादाची केंद्रस्थाने समजली जात; पण याशिवाय प्रशासक म्हणून त्यांची कीर्ती संपादन केली होती. म्हणून अजमेरच्या राजस्थान लोकसेवा आयोगाचे अध्यक्ष म्हणून त्यांना बोलावले गेले.

### तुमच्या भाषणातून...

**एकदा गुरू नानक जयंतीला त्यांचे 'बी.एच.यू.मधील शीख संघटनेपुढे व्याख्यान चालू असताना डॉ. राधाकृष्णन रस्त्यावरून जात होते. त्यांच्या कानावर भाषणाचे शब्द पडले. त्यांना भाषण श्रवणीय वाटले व ते बाहेर ऐकत उभे राहिले. नंतर त्यांनी माझ्या वडिलांना सांगितले, "त्या दिवशी तुमच्या भाषणातून शीख धर्माबद्दल बरेच काही शिकलो."**

त्यांचा तत्त्वज्ञान, धर्म यांचा व्यासंग मोठा होता. स्वतः निधर्मी असूनही. विविध धर्मांच्या तत्त्वज्ञानाचा त्यांचा सखोल अभ्यास होता. एकदा गुरू नानक जयंतीला त्यांचे 'बी.एच.यू.मधील शीख संघटनेपुढे व्याख्यान चालू असताना डॉ. राधाकृष्णन रस्त्यावरून जात होते. त्यांच्या कानावर भाषणाचे शब्द पडले. त्यांना भाषण श्रवणीय वाटले व ते बाहेर ऐकत उभे राहिले. नंतर त्यांनी माझ्या वडिलांना सांगितले, "त्या दिवशी तुमच्या भाषणातून शीख धर्माबद्दल बरेच काही शिकलो."

पण माझ्या वडिलांच्या स्वभावात काही विसंगती पण होत्या. राग आला, की ते रुद्रावतार धारण करायचे. त्या वेळी नाही, पण वयाने मोठे झाल्यावर मला ही विसंगती जाणवे. इतका शहाणपणा असलेला, ज्ञानसागरात पोहणारा हा विद्वान माणूस रागावर ताबा मिळवू शकत नाही? माझी लहानपणची एक आठवण अशी आहे. मी एका नोकराबरोबर सायकल शिकायला मैदानावर गेलो. त्या दिवशी सायकलीचा तोल सांभाळायला मी शिकलो आणि मला कोण आनंद झाला! घरी आईवडिलांना सांगायला मी आलो मोठ्या हुरूपाने... पण मला भेटले रुद्रावतार धारण केलेले माझे वडील. त्या दिवशी घरी बॅडमिंटन खेळायला बाहेरचे विद्यार्थी आले नव्हते म्हणून तात्यासाहेब माझ्याबरोबर खेळायला निघाले होते. तेव्हा त्यांना कळले, की मी घरात नाही. आईची परवानगी घेऊनच मी गेलो होतो, तेव्हा त्यांना माझ्यावर राग काढायला काही कारण नव्हते. पण परत आल्यावर त्यांचे ते वाक्ताडन मला खूप झोंबले.

"No one is perfect' असे म्हणत मी अशा गोष्टींकडे काणाडोळा करायला शिकलो. त्यांचा मनापासून आदर करणारे इतके लोक मी विभिन्न भागातले, विभिन्न पेशातले पाहिले, की मला स्वतःला वाटे आपणही त्यांच्यासारखे उत्कृष्ट शिक्षक व्हायला हवे होते. तसेच, त्यांचे अफाट वाचन पाहून त्यांच्या तुलनेत मी अल्पश्रुत, अल्पपठित आहे, याची मला जाणीव आहे. पण कधी कधी वाटते, की त्यांनी त्यांच्या विषयावर पाठ्यपुस्तके लिहिली असती, तर त्यांचे शिक्षकी कसब नव्या पिढीपर्यंत पोचले असते. ते आपल्या असंख्य डायऱ्या, वह्या मागे ठेवून गेले. आपल्या वाचनातून गोळा केलेली विचारांची रत्ने त्यांत साठवली आहेत. ती त्यांनी स्वान्तःसुखाय गोळा केली. पण त्यांचे एखादे संकलन स्वतःच्या टीकेसह प्रसिद्ध केले असते तर? तर ते बहुजनसुखाय झाले असते. मी या स्फूर्तिस्थानापासून पुष्कळ शिकलो; पण पुष्कळ आत्मसात करू शकलो नाही.